म.फु.कृ.वि./विस्तार/प्रकाशन क्र. २५२ /२०१९

# मुक्त गोठा - एक वरदान पशुधन व शेतकऱ्यांसाठी



## शेतकरी प्रथम कार्यक्रम

**भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली**

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ**

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहमदनगर

# मुक्त गोठा - एक वरदान पशुधन व शेतकऱ्यांसाठी



जनावरांचे योग्य व्यवस्थापन केल्यास दूध व्यवसाय फायदेशीर ठरतो. पशु सुयोग्य व्यवस्थापनासाठी चारापाणी, खाद्य, आरोग्य आणि निगा या गोष्टी या जागेत केल्या जातात ती जागा म्हणजे जनावरांचा गोठा. या गोठयाचा प्रमुख उद्देश म्हणजे गुरांचे ऊन, वारा, पाऊस यांसारख्या प्रतिकूल परिस्थितीत संरक्षण व्हावे आणि गुरांना आरोग्यदायक वातावरणात रहावयास मिळावे व पशुसंगोपन व्यवस्थित व्हावे.

## गुरांचे मुक्त गोठयामुळे होणारे फायदे

१. तीव्र ऊन, वारा, पाऊस यांपासून जनावरांचे संरक्षण होते व दूध उत्पादनात होणारी घट टळते.
२. गुरांना त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे खादय, चारा व स्वच्छ पाणी उपलब्ध होते.
३. संसर्गजन्य रोगांना प्रतिबंध होतो.
४. स्वच्छ दूध उत्पादनास मदत होते व दुधाला चांगला भाव मिळण्यास मदत होते.
५. आजारी गुरे वेळीच ओळखून त्यांना आवश्यक ते उपचार करुन होणारे संभाव्य नुकसान कमी करता येते.
६. गोठयात असलेल्या गुरांचा माज वेळीच ओळखून योग्य वेळी कृत्रिम रेतन करुन प्रजनन क्षमता उत्तम प्रमाणात ठेवता येते.
७. गुरांचे गोठयात संगोपन केल्याने रोगप्रसारक गोचीडांवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवता येते.

## गोठयाचे प्रकार

ग्रामीण भागात स्थानिक परिस्थिती व हवामान यानुसार जनावराची निवा–याची सोय केलेली असते. त्यानुसार आपल्याकडे जनावराचे विविध प्रकाराचे गोठे पहावयास मिळतात. पाचटाच्या छपरात,घराच्या पडवीला,सोप्याला किंवा घराबाहेर भिंतीला उभारलेल्या आडोशाला तसेच काही ठिकाणी राहत्या घराच्या पाठीमागे बंदिस्त भागात जनावरांना निवा–यासाठी गोठे बांधलेले आढळतात. परंतु याउलट शासकीय दुग्धशाळा, संशोधन संस्था, आधुनिक सहकारी दुग्धशाळा, सैनिक दुग्धशाळा व प्रगतीशील शेतक–यांच्या शेतावर शास्त्रोक्त पध्दतीचे गोठे पहावयास मिळतात. साधारणपणे भौगोलिक परिस्थिती, हवामान, जनावरांची संख्या, गोपालकांची आर्थिक स्थिती इत्यादी गोष्टीवर गोठयाचे प्रकार व मांडणी अवलंबून असते. सदयस्थितीत मुख्यत्वे पारंपारिक पध्दतीचा आणि मुक्त / खुला गोठा, या दोन शास्त्रीय

पध्दतीचे गोठे अधिक प्रचलित होत असल्याचे दिसून येते.

## मुक्त गोठा

या पध्दतीच्या गोठयात गायी / म्हशींना एकाच ठिकाणी बांधून न ठेवता दिवसरात्र मोकळेच सोडलेले असते. फक्त धारा काढते वेळी स्वतंत्र दोहनगृहात नेवून धारा काढल्या जातात. बंदिस्त आवाराचे एका किंवा दोन्ही बाजूस आच्छादीत गोठा असतो व त्यात चारा व निवा–याची सोय असते. गोठयासमोरील मोकळी जागा सर्व बाजूनी ४ फुट उंचीची भिंत उभारुन अगर कुंपन घालून बंदिस्त केलेली असते. या मोकळया जागेत गाई/म्हशी मुक्तपणे फिरतात. गोठयातील गव्हाणीत चारा घालण्याची व्यवस्था असते तर पाण्याची सोय गोठयात मोकळया जागेत हौद बांधून केलेली असते. चारा व पाणी दिवसभर मिळेल याची काळजी घेतली जाते. संशोधनाअंती प्रचलीत पध्दतीच्या गोठयापेक्षा मुक्त पध्दतीच्या गोठयातील गायांच्या / म्हशींच्या दुधउत्पादनात वाढ झालेली आढळली. तसेच प्रजननातही सातत्य दिसून आले आहे.

मुक्त निवारा पध्दतीच्या गोठयाची काही ठळक वैशिष्ट्ये

१. या पध्दतीच्या गोठयात बांधकाम खर्च कमी असतो.
२. कमी बदलासह गोठा आकारात वाढ व घट करता येते.
३. माजावरील जनावरे ओळखणे सोपे जाते.
४. जनावराच्या मनाप्रमाणे खाणे–पिणे चालते, पुरेसा व्यायाम मिळतो, योग्य जागा पाहून जनावरे आरामशीर बसू शकतात त्यामुळे दूध उत्पादनात वाढ होते व जनावरे निरोगी राहतात.
५. देखभालीसाठी मनुष्यबळ कमी लागते.
६. स्वतंत्र दोहनगृहात धारा काढल्यामुळे स्वच्छ दूध उत्पादनास मदत होते





आकृती क्र.१: मुक्त निवारा पध्दतीचा गोठा

## गोठा व गव्हाणीची जागा

| गव्हाणीची रूंदी (सें.मी.) | गोठ्यातील आवश्यक जागा (चौ.मी.) | गव्हाणीची रूंदी (सें.मी.) |
|---|---|---|
| गाय | ३.५ | ६० |
| म्हैस | ४.० | ६० |
| वळू | १२.० | ६० |
| बैल | ३.५ | ६० |
| गाभण जनावरे | १२.० | ६० |
| मोठी वासर | २.० | ४० |
| लहान वासरे | १.० | ३० |

## गोठयाचे बांधकाम

निरनिराळ्या जनावरांचे गोठे मजबूत, टिकाऊ, शास्त्रीय पध्दतीने बांधकाम करुन आर्थिकदृष्टया परवडणारे असावेत. त्यासाठी खालील बाबीवर बारकाईने लक्ष देणे फायदयाचे असते.


## गोठयाची जागा

या जागेवर गोठा करावयाचा आहे तेथील जमीन कठीण, टणक आणि कोरडी असणे आवश्यक आहे. बसण्यास सिमेंट कॉंक्रीट, भाजलेल्या विटा किंवा दगडी फरशी यांचा उपयोग करता येतो. गोठयातील जमीन थोडी खरबडीत ठेवावी. त्यामुळे जनावरे घसरुन पडत नाहीत. जनावरास केवळ उभे राहण्यासाठी ५ ते ५.५ फुट जागा लागते. तसेच जनावरे बांधावयाचे दोन कप्प्यातील अंतर ४ फुट असावे गोठयातील जमिनीस गव्हाणीकडून एक ते दीड इंच उतार दिलेला असावा.

## गव्हाण

प्रत्येक जनावरास पोटभर चारा मिळण्यासाठी प्रमाणशीर गव्हाण असणे महत्वाचे आहे. सर्वसाधारण गव्हाणीची उंची २० ते २४ इंच, रुंदी २४ इंच आणि खोली १५ इंच असावी, मजबूत गव्हाण तयार करण्यासाठी दगडी फरशी, लाकडी जाड फळया, सिमेंट कॉंक्रीट इत्यादीने बनविलेली असावी. संपूर्ण लांबीची गव्हाण साफ करण्यासाठी सोईची असते. गव्हाणीच्या जनावराकडील बाजूस पूर्ण लांबीचे लोखंडी पाईप कॉंक्रीटमध्ये बसविल्यास जनावरांनी घासले तरी काठ तुटू शकत नाहीत. गव्हाणीचा पृष्ठभाग गुळगुळीत आणि काठ गोलाकार असावेत.






आकृती क्र.४:- गव्हाण-जनावरांना चारा देण्यासाठी

## भिंती

भिंतीचा उपयोग प्रामुख्याने थंड वारा, पाऊस यापासून जनावरांचे संरक्षण करण्यासाठी होतो व छताला आधारही मिळतो. मुक्त गोठा पध्दतीत भिंतीची उंची ४ फुट असावी. हवामान व बांधकाम साहित्याची किंमत याचा विचार करुन भिंतीसाठी दगड, माती, विटा, सिमेंट, लाकडी, लोखंडी किंवा काँक्रीट खांब इ. वापर करावा.

## छत

गोठयावरील छत वजनाने हलके, कठीण व टिकावू असावे. तसेच ते मंदउष्णवाहक असावे. जास्त पावसाचे भागात अधिक उतरत्या छपराचे गोठे असावेत. अधुनिक पध्दतीच्या गोठयावर सिमेंटचे पन्हाळी पत्रे, ॲसबेसटॉस पत्रे इत्यादीचा छतासाठी वापर करावा. छताची उंची बाहेरील भिंत / गव्हाणीच्या बाजूने २.१० मीटर असावी व दुसरी बाजू २.८० मीटर उंच असावी. छताची रुंदी साधारणपणे ३ मीटर असावी.

## शेणमूत्र गटारे

गोठयातील शेणमूत्र आणि सांडपाणी व्यवस्थित वाहून जाईल आणि सफाई व्यवस्थित करता येईल अशाप्रकारचे गटार असावे. त्याला लांबीच्या प्रमाणात १:४० असा योग्य उतार दिलेला असावा. गटारीची रुंदी २५ ते ३० सें.मी. असावी.

## पाण्यासाठी हौद

गोठयातील सर्व जनावरांना ताजे व स्वच्छ पाणी सदैव उपलब्ध असावे. दुभत्या जनावरांना पाण्याची गरज अधिक असते. यासाठी स्वतंत्र हौद किंवा काँक्रीटटाक्या पक्क्या बांधून घ्याव्यात. त्यात स्वच्छ, ताजे पाणी दररोज भरण्यात यावे. आठवडयातून एकदा हौद व टाक्या मोकळया करुन स्वच्छ धूवून चूना लावावा. हौदाची उंची साधारणपणे ६५ते ७५ सें.मी. असावी जेणेकरुन सर्व लहान मोठया जनावरांना सुलभरित्या पाणी पिता येईल. हौदावर सावलीची सोय असल्यास अधिक उत्तम असते. त्यामुळे पाणी थंड राहते व शेवाळ कमी प्रमाणात होते.











मुख्य संपादक : डॉ. शरद गडाख, संचालक, विस्तार शिक्षण

संपादक : डॉ. पंडित खर्डे, प्रमुख अन्वेषक, भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम कार्यक्रम

सहसंपादक : डॉ. दिलीप देवकर, सहयोगी प्राध्यापक, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, धुळे

आणि लेखक
डॉ. रविंद्रनाथ निमसे, सह अन्वेषक, भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम कार्यक्रम
डॉ. सचिन सदाफळ, सह अन्वेषक, भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम कार्यक्रम
डॉ. भगवान देशमुख, सह अन्वेषक, भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम कार्यक्रम
श्री. विजय शेडगे, वरिष्ठ संशोधन सहयोगी, भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम कार्यक्रम
श्री. किरण मगर, प्रक्षेत्र सहाय्यक, भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम कार्यक्रम
श्री. अमोल गायकवाड, प्रक्षेत्र सहाय्यक, भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम कार्यक्रम


भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या आर्थिक सहाय्याने